# जिल्हा परिषद, सोलापूर
## समाज कल्याण विभाग

जा.क्र.जिपसो/सकवि/आस्था/ /
दिनांक :- / ०२ / २०२५
zpsolapurswo@gmail.com

प्रति,
मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र.)
जिल्हा परिषद, सोलापूर

विषय :- माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सन २०२४ – २०२५
१ ते १७ मुद्दयांची माहिती सादर करणेबाबत.

संदर्भ :- आपलेकडील पत्र जा.क्र.जिपसो/साप्रवि-१/कार्या-१६क/ /२०२५
सोलापूर दिनांक :- / ०२ / २०२५

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस सादर करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सन २०२४ – २०२५ या वर्षाची १ ते १७ मुद्दयांची माहिती सादर करणेबाबतचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

वरील प्रमाणे या कार्यालयाकडील माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २०२४ – २०२५ या कालावधीतील माहिती अद्यावत करुन या पत्रा सोबत जोडलेले आहे. सदरची माहिती माहितीसाठी सविनय सादर

सोबत :- १ ते १७ मुद्दांची माहिती

(सुलोचना सोनवणे)
जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद, सोलापूर

प्रत :- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांना माहितीस्तव सादर

# समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर

## जिल्हा समाज कल्याण अधिकारी

## अधिक्षक

**आस्थापना विभाग**

**वरिष्ठ सहाय्यक**

**कनिष्ठ सहाय्यक**

**वाहन चालक**

**परिचर**

**लेखा विभाग**

**सहाय्यक लेखाधिकारी**

**कनिष्ठ सहाय्यक लेखा**

**समाज कल्याण विभाग**

**विस्तार अधिकारी**

**समाज कल्याण निरीक्षक**

**<u>केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ अन्वये माहिती प्रसिध्दबाबत.</u>**

कलम ४ ची खऱ्या आर्थिक अंमलबाजावणी होणेसाठी सर्वश्रम राज्यातील सर्व लोक प्राधिकारी यांची यादी प्रसिध्द करणे आवश्यक आहे. कोणतीही संस्था जी घटनेनुसार एखाद्या कायद्यानुसार अथवा नियम किंवा शासकीय आदेशानुसार स्थापित करण्यात आली आहे. अथवा जी शासनाच्या मालकीची किंवा शासनाने नियंत्रित केलेली अथवा शासनाकडून ज्या संस्थेला पुरेसा निधी प्राप्त होत आहे. अशा सर्व माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ चे कलम अंतर्गत आपणहू माहिती प्रसिध्द करणे ही यादी प्रत्येक संचालन विभागाकडून होणे बंधनकारक आहे.

**कलम – २ एच नमुना (अ)**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये विभागावर लोकप्राधिकारी यांची यादी**

शासकीय विभागाचे नांव :- समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर

| अ. क्र. | लोकप्राधिकारी संस्था | संस्था प्रमुखाचे पदनाम | ठिकाण/पत्ता |
|---|---|---|---|
| १ | समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,सोलापूर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | जिल्हा परिषद २ री इमारत तळमजला |

**कलम – २ (एच)**
**शासनाकडून पुरेसा निधी प्राप्त लोकप्रतिनिधी संस्थांची यादी**

शासकीय विभागाचे नांव :- समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर

| अ. क्र. | लोकप्राधिकारी संस्था | संस्था प्रमुखाचे पदनाम | ठिकाण/पत्ता |
|---|---|---|---|
| १ | समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,सोलापूर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | जिल्हा परिषद २ री इमारत तळमजला |

**कलम – ४ (१) (बी) (१)**

जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण विभाग या कार्यालयातील कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील

- कार्यालयाचे नांव :- समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर
- पत्ता :- जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, २ री इमारत तळमजला
- कार्यालय प्रमुख :- जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर
- शासकीय विभागाचे नांव :- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
- कोणत्या मंत्रायातील खात्याच्या अधिनस्त :- सामाजिक न्याय विभाग मंत्रालय मुंबई – ३२
- कार्यक्षेत्र :- सोलापूर जिल्हा भौगोलिक – ११ तालुके कार्यानुरुप कल्याण
- विशिष्ट कार्य – अनुजाती जमाती, भटक्या जमाती व इमाव कल्याण शिक्षण फी, गुणवत्ता फी, अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती, अपंगाचे कल्याण, दलित वस्ती सुधारणा मागासवर्गीयांचे कल्याण इत्यादी
- विभागाचे ध्येय / धोरण :-

मागासवर्गीयांच कल्याण, दलित वस्ती सुधारणा धोरण, ग्रामीण विकास, दुर्बलतर जनवर्ग आणि विशष:त अनुसूचित जाती अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपुर्वक शैक्षणिक व सामाजिक व आर्थिक, सामाजिक हित संवर्धन करणे आणि त्यांचे सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण या पासून संरक्षण करणे. हे धोरण आहे.

तसेच दिव्यांग व्यक्तींकडे त्यांच्या दिव्यांगत्वाकडे न पाहता त्यांच्यामध्ये असलेल्या सामर्थ्याकडे पाहून त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्त, सामर्थ्य विकसित करुन त्यांना समाज जीवनाच्या सर्व अंगामध्ये समाज संधी, संपूर्ण सहभाग व त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे या दृष्टीने कल्याणकारी योजना राबवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करणे हे धोरण आहे. संस्थेच्या संरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचे प्रत्येक स्तरावरचे तपशील जिल्हा स्तर कार्यालयात उपलब्ध आहे.

- कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक व वेळ :- ------------- वेळ सकाळी ९.४५ ते ६.१५
- साप्ताहिक सुट्टी व विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळ प्रत्येक शनिवार व रविवार सुट्टी

**कलम ४ (१) (बी) (२) नमुना (अ)**

जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण विभाग या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकाराचा तपशील

**(अ)**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार आर्थिक | कोणत्या कायद्या/नियम/ शासन निर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | वेतन,प्रवास भत्ता, बी.सी. एस.आर.रुल ५९८ परिशिष्ट १, बीसीएसआर कलम २ अन्वये प्रवास भत्ते बील मंजूर करणेचे अधिकार | अर्थ विभाग,जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून आलेले कर्मचाऱ्यांचे वेतन, प्रवास भत्ता बील, सादील खर्च धनादेश वटविण्याचे अधिकार | |

**(ब)**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार – प्रशासकीय | कोणत्या कायद्या/नियम/ शासन निर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | प्रशासकीय | म.जि.प.व पं.स.लेखासंहिता १९६८ नियम क्र. ४ खालील परिशिष्ठ २ अन्वये २०५० लाखापर्यंत | |

**(क)**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार – फौजदारी | कोणत्या कायद्या/नियम/ शासन निर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | निरंक | | |

**(ड)**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार – फौजदारी | कोणत्या कायद्या/नियम/ शासन निर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | निरंक | | |

## कलम ४ (१) (बी) (२) नमुना (ब)

| अ. क्र. | पदनाम | कर्तव्य आर्थिक/ प्रशासकीय /फौजदारी अन्यायीक | कोणत्या कायद्या/नियम/शासन निर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | कार्यालयीन विविध योजना वरील कामजावर नियंत्रीत अंमलबाजवणी व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे. | शासन निर्णय २७ फेब्रुवारी २००४ जिल्हा स.क.स. व. पं.स. अधि. नियम १९६० कलम १०० व १२३ | |
| २ | कार्यालयीन अधिक्षक | कार्यालयीन कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे व काम करुन घेणे. | २७ फेब्रुवारी २००४ | |
| ३ | वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता | ओळख पत्र,तीन चाकी सायकल, बीज भांडवल देणे, दिव्यांग, मुकबधीर मतिमंद व संमिश्र केंद्र इत्यादी संस्थाना वेतन व वेतनेत्तर अनुदान रिक्त पद आहे. | २७ फेब्रुवारी २००४ | |
| ४ | सहाय्यक सल्लागार | रिक्त दिव्यांगाचे फायदे योजना, लाभ इ. बाबत दिव्यांगाना मार्गदर्शन करणे. दिव्यांग व्यक्ती (समान संधी हक्काचं संरक्षण व संपूर्ण सहभाग अधिनियम ११९५) अंमलबजावणी | २७ फेब्रुवारी २००४ | |
| ५ | समाज कल्याण निरीक्षक | योजनेची अंमलबजावणी करणे व याबाबत वरीष्ठांकडे माहिती सादर करणे. प्रशासकीय आदेश सादर करणे, मान्यता घेणे योजनेच्या आर्थिक बाबत कार्यवाही करणे. | महा. नागरी सेवा नियम १९८१ | |
| ६ | विस्तार अधिकारी | अनुदानित वसतीगृह मान्यता, वेतन व भत्ते अदा करणे, आंतरजातीय विवाहीत दांपत्यांना प्रोत्साहनपर भत्ता इ. दलित वस्ती सुधार योजना राबविणे. | महा. नागरी सेवा नियम १९८१ | |
| ७ | वरिष्ठ लिपीक | आस्थापना विषयक कामकाज, माहिती अधिकार, लोकशाही दिन, लोक आयुक्त, सेवानिवृत्ती प्रकरणे, वेतन निश्चिती, प्रस्ताव प्रकरणे, हजेरीपत्रक, कर्मचाऱ्यांचे रजा प्रवास, सेवा पुस्तके अद्यावत करणे, टपालावर कार्यवाही व मा. जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी सांगितलेली कामे करणे. | महा. नागरी सेवा नियम १९८१ | |
| ८ | कनिष्ठ सहाय्यक | सोलापूर जिल्हयातील सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १०, शिक्षण फी, परिक्षा फी, गुणवत्ता फी, अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती | महा. नागरी सेवा नियम १९८१ | |
| ९ | कनिष्ठ सहाय्यक (लेखा | धनपालाचे संपूर्ण कामकाज, आवक जावक पत्रव्यवहार वरिष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली कामे, संगणक टायपिंग इत्यादी कामे करणे. | महा. नागरी सेवा नियम १९८१ | |
| १० | परिचर | कार्यालयीन स्वच्छता, कार्यालयीन टपाल देणे व इतर कार्यालयीन कामकाज | महा. नागरी सेवा नियम १९८१ | |

## कलम ४ (१) (बी) (३)

निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदायीत्व करुन कार्यपध्दतीचे प्रकाशन
या विभागाचे माहिती निरंक समजण्यात यावी.

## कलम ४ (१) (बी) (४)
## तरतूद (वार्षिक)

| अ.क्र. | काम / कार्य | कामाचे प्रमाणे | आर्थिक | प्रभिप्राय |
|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |

## कलम ४ (१) (ब) (४) नमुना (ब)

कामाची कालमर्यादा --------------------------------------- काम पूर्ण होण्यासाठी
प्रत्येक कामाची कालमर्यादा

| अ.क्र. | काम / कार्य | दिवस/तास पुर्ण करण्यासाठी | जबाबदार अधिकारी | तक्रार निवारण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - |

कलम ४ (१) (ब) (५) नमुना (अ)
-------------------------------- कामाशी संबंधीत नियम / अभिप्राय

| अ.क्र. | सुचना पत्रकानुसार दिलेले विषय | नियम क्रमांक व खर्च | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | निरंक | | |

कलम ४ (१) (ब) (५) नमुना (ब)

| अ. क्र. | सुचना पत्रकानुसार दिलेले विवरण | शासन निर्णय व क्रमांक व तारीख | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | आंतरजातीय विवाहितांना प्रोत्साहनपर अनुदान | अस्पश्य निवारणाच योजनेचा एक भाग म्हणून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना शासनातर्फे १९५८ सालापासून राबविण्यात येते. आंतरजातीय विवाहितांना प्रोत्साहन देण्याची ही योजना अनुजाती/अनुजमाती विमुक्त भटक्या जमाती व भटक्या जमातीच्या व्यक्तीपैकी एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती संवर्ण हिंदू लिंगायत, जैन अशा जातीतील विवाहास आंतरजातीय विवाह म्हणून संबोधण्यात येते. १ एप्रिल १९९५ पासून या आर्थिक सहाय्यात वाढ केली असून आता र. रु. १५०००/- इतके आर्थिक सहाय्य देण्यात येत होते. आता शासन निर्णय दिनांक १/२/२०१० पासून अनुदानात वाढ करण्यात आली असून र.रु.५०,०००/- झाले आहे. अनुदानातून खालील प्रमाणे अनुदान दांपत्यांना वाटप करण्यात येते.दांपत्यांना बँकेत संयुक्त खात्यावर र.रु.५०,०००/- धनादेश अदा करण्यात येतो. | |
| २ | अनुदानित वसतीगृह | सोलापूर जिल्हयात एकूण १५७ वसतीगृहे कार्यरत आहेत. अनुजाती व विमुक्त भटक्या जमाती व इ. जमातीतील मुले शिक्षणापासून वंचित राहू नये. म्हणून शासनाने सदरची योजना अंमलात आणली आहे. वसतीगृहातील विद्यार्थ्यांना दरमहा र. रु. १५००/- प्रमाणे एका वर्षातील शैक्षणिक दिवसाची म्हणजे १० महिन्याचे परक्षिण अनुदान देण्यात येते. त्यातील पहिला हप्ता जुलै मध्ये ६०% अनुदान गत वर्षाच्या अंतिम अनुदानावर आधारीत देण्यात येते. व उर्वरीत ४०% अनुदान माहे जानेवारी मध्ये निर्धारण केल्यानंतर देण्यात येते. | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | दलित वस्ती सुधार योजना | दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ग्रामीण भागातील अनुजातीच्या वस्त्यामधून कित्येक मुलभूत सुखसोयीचा अभाव असतो. त्यामुळे त्यांना असंख्या अडचणींना व गैरसोयीना तोंड द्यावे लागते. अशा वस्त्यांमधून स्वच्छताविषयी सोयी, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, अंतर्गत रस्ते, समाज मंदिर, गटार संरक्षक भिंत इत्यादी आवश्यक कामे घेतली जातात.<br>प्रत्येक दलित वस्तीला शासन निर्णय ५ डिसेंबर २०११ अन्वये अनुदान मंजूर करण्यात येते. सदर लोकसंख्या प्रमाणे मंजूर केले जाते.<br>१. १० ते २५ लोकसंख्या र. रु. २०००००/-<br>२. २६ ते ५० लोकसंख्या र. रु. ५०००००/-<br>३. ५१ ते १०० लोकसंख्या र. रु. ८०००००/-<br>४. १०१ ते १५० लोकसंख्या र. रु. १२०००००/-<br>५. १५१ ते ३०० लोकसंख्या र. रु. १५०००००/-<br>६. ३०१ ते पुढे लोकसंख्या र. रु. २००००००/-<br>सदरचा प्रस्ताव योग्य त्या कागदपत्रासह ग्रामपंचायतीने तयार करुन गट विकास अधिकारी यांचे मार्फत जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडे सादर करावा. २००५ अन्वये पुढील २ वर्षासाठी फक्त पाणी पुरवठा योजना घ्याव्यात असे निर्देशन आहे. | |
| ४ | दिव्यांग कल्याण योजना | समाजातील दिव्यांग, कर्णबधीर (बहिरे) अस्थिव्यंग, मनोविकलांग, (मतिमंद) कुष्ठरोग मुक्त दिव्यांगाच्या अंगी असलेल्या सुप्त शक्तीचा विकास व्हावा. याकरीता त्यांना प्ररना प्रोत्साहन देवून समाजामध्ये सर्वत्र सन्मानाने जगता यावे. या करीता दिव्यांग व्यक्ती (समाज संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५ हा कायदा शासन राबवित आहे. दिव्यांगाना सक्षम बनवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात संम्मिलित करणे हा उद्देश आहे.<br>समाज कल्याण विभागामार्फत पुढील योजना राबविल्या जातात.<br>१) दिव्यांग शिष्यवृत्ती :-<br>अ) दिव्यांग विद्यार्थ्याना शालांतपूर्व शिष्यवृत्ती :- इयत्ता १ ली ते १० वी या वर्गात शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाची शालांत पूर्व शिष्यवृत्तीची योजना कार्यरत आहे.<br>ब) दिव्यांग विद्यार्थ्यांना मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती :- इयत्ता ११ वी पासून पुढील उच्च शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाची शालांत पूर्व शिष्यवृत्तीची योजना कार्यरत आहे.<br>उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी दिव्यांग विद्यार्थ्यांनी संबंधित शिक्षण संस्थे मार्फत विहित नमुन्यातील अर्ज संबंधित गट विकास अधिकारी यांचेकडे सादर करावा. अर्जा सोबत वैद्यकिय प्रमाणपत्र, गत वर्षाचा गुण पत्रीका जोडणे आवश्यक आहे.<br>२) कृत्रीम अवयव :- दिव्यांगांना कृत्रीम अवयव देण्याची योजना आहे. कृत्रीम अवयव या सदराखाली पुढील योजनाचा समावेश आहे.<br>अ) वैयक्तिक श्रवण यंत्र :- ० ते ५० वयोगटातील कर्णबधीरांना त्यांच्या श्रवणऱ्हासाच्या श्रवणालेख पाहून वैयक्तिक श्रवण यंत्रे पुरविली जातात.<br>ब) दिव्यांग – अव्यंग विवाह योजना :- आंतरजातीय विवाहाच्या दिव्यांग – अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देण्याची योजना.<br>३) लघुउद्योगासाठी शारिरीकदृष्या दिव्यांग व्यक्तींना वित्तीय सहाय्य (बीज भांडवल योजना) :- दिव्यांग व्यक्तींना स्वत:चा उद्योग सुरु करुन स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिक पुरवर्सन साधता यावे. म्हणून र.रु.१,५०,०००/- पर्यंतच्या प्रकल्पास अनुदान देण्याची योजना आहे. सदरील योजनेद्वारे प्रकल्पाच्या ८०% रक्कम बँक कर्ज आणि २०% रक्कम समाज कल्याण विभागाकडून बीज भांडवल म्हणून अनुदान देण्यात येते. यासाठी रितसर अर्ज सादर करणे आवश्यक आहे.<br>४) गुणवंत विद्यार्थी पुरस्कार :- विभागीय परिक्षा मार्फत देण्यात येणाऱ्या इयत्ता १० ते १२ वी परिक्षेमधील गुणवत्ते नुसार प्रथम तिन क्रमाने उत्तीर्ण होणाऱ्या अंध, कर्णबधीर, व अस्थीविकलांग विद्यार्थ्यांना समारंभपुर्वक र.रु.१०००/-रोख पारितोषीक देवून गौरविले जाते.<br>५) दिव्यांग कल्याण पुरस्कार योजना :- उत्कृष्ट कार्य करणारे दिव्यांग कर्मचारी, स्वयंउद्योजक, दिव्यांगांचे नियुक्त व सेवा योजना अधिकारी यांना राज्य पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येते.<br>६) दिव्यांगाना ओळखपत्र :- दिव्यांग व्यक्तींना ओळखपत्र देण्याची योजना कार्यन्वीत आहे. यासाठी दिव्यांग व्यक्तीनी त्रीसदस्यीय समितीच्या वैद्यकिय दाखालासह अर्ज करणे आवश्यक आहे. त्यासोबत रेशनकार्ड झेरॉक्स, रहिवासी दाखला, तीन फोटो इत्यादी.<br>७) नॅशनल ट्रस्ट १९९९ च्या कायदयाची अंमलबजावणी करणे :- मतिमंद, सेरेब्रल पाल्सी, बहुविकलांग पाल्यास पालकत्व देण्याची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे मार्फत केली जाते.<br>८) स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांग शाळांना सहाय्य अनुदान :- सोलापूर जिल्हयात मुक बधिर, मतिमुद, दिव्यांग व अस्थिव्यंग मान्यता प्राप्त ५२ अनुदानित शाळा कार्यरत आहेत. सदर शाळा स्वयंसेवी संस्थामार्फत कार्यान्वीत आहे. दिव्यांग लाभार्थ्यांना मोफत गणवेश, शिक्षण व परिपोषण इत्यादी सुविधा पुरविल्या जातात. जिल्हयात एकूण २७६० दिव्यांग लाभार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. व ६५६ कर्मचारी कार्यरत आहेत. समाज कल्याण विभागाकडून प्रत्येक विद्यार्थ्यांना दर महा र. रु. ९००/- प्रमाणे परिपोषण अनुदान दिले जाते. इमारत खर्च दोन्ही पैकी जी रक्कम कमी असेल ती अनुज्ञेय आहे. मान्यता प्राप्त दिव्यांग शाळेतील कर्मचाऱ्यांना दरमहा शासनाने विहित केलेल्या वेतनश्रेणी प्रमाणे १००% वेतन व भत्ते अदा केले जातात. | |

<table>
<tr><td></td><td></td><td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>प्रवर्ग</th><th>अनुदानीत नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त शाळांची संख्या</th><th>विना अनुदानीत नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त शाळांची संख्या</th><th>एकूण शाळांची संख्या</th><th>एकूण लाभार्थी संख्या</th><th>कर्मचारी संख्या</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td><td>७</td><td>८</td></tr>
<tr><td>१</td><td>दिव्यांग</td><td>०४</td><td>-</td><td>०४</td><td>१७०</td><td>५७</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>अस्थिव्यंग</td><td>१०</td><td>०२</td><td>१०</td><td>३८०</td><td>७७</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>मतिमंद</td><td>१६</td><td>०६</td><td>२२</td><td>८७५</td><td>१९९</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>मूकबधीर</td><td>२२</td><td>०७</td><td>२७</td><td>१३३५</td><td>३२३</td><td></td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td><td>५२</td><td>१५</td><td>६७</td><td>२७६०</td><td>६५६</td><td></td></tr>
</table>
सदर योजना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग मंत्रालय मुंबई, आयुक्त दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे मार्फत राबविले जातात. जिल्हा पातळीवर समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद अंतर्गत कार्यान्वीत आहे.
</td><td></td></tr>
<tr><td>५</td><td>वृध्द साहित्कि व वृध्द कलाकरांना मानधन योजना</td><td>महाराष्ट्रातील वृध्द साहित्कि व वृध्द कलाकारांना त्यांच्या वृध्दापकाळाचे मदत म्हणून मानधन दिले जाते.सदरची योजना सांस्कृतिक कार्य संचालनालया मार्फत राबविली जाते. शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्रमांक पुरक/६९१९/प्र.क्र.८३/सां.का.-४/मुंबई दिनांक ९ सप्टेंबर २०१९ अन्वये वृध्द कलाकारांना मानधनामध्ये सुधारणा होवून दर महा. अश्रेणी र.रु. ३१५०/- बश्रेणी र.रु. २७००/- कश्रेणी र.रु.२२५०/- या प्रमाणे मानधन दिले जाते.<br>१. वय ५० पेक्षा जास्त असावे<br>२. वार्षीक उत्पन्न र.रु. २४०००/- पेक्षा कमी असावे<br>३. साहित्कि व कलाकाराच्या कलाजिवना विषयी व अनुभव विषयी मान्वसर संस्थेचे प्रमाणपत्र असावे. लाभार्थ्याने आपले अर्ज त्यांचे तालुक्याच्या गट विकास अधिकारी यांचे कार्यालयाकडे सादर करावेत. व याबाबत गट विकास अधिकारी कार्यालयाकडे संपर्क साधावा. लाभार्थीची निवड वृध्द साहित्कि व वृध्द कलाकार जिल्हा स्तरीय निवड समिती सोलापूर जिल्हा यांचे मार्फत होते. सोलापूर जिल्हयात एकूण ७९४ लाभार्थी आहेत. त्यांना मानधन मिळते आहे.</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td>अनुसूचित जातीच्या मुला / मुलींसाठी आश्रम शाळा</td><td>महाराष्ट्र शासन समाज कल्याण सांस्कृती कार्य व क्रिडा विभाग, मुंबई श.नि.व्ही.ए.एस. १०९५/प्र.क्र.५/ मावक-६/दिनांक २५ जानेवारी १९९६ अन्वये अनुसूचित जातीच्या मुला – मुलींसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत आश्रमशाळा योजना सन १९९६ – १९९७ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोलापूर जिल्हामध्ये १) यमाईदेवी प्राथमिक आश्रमशाळा, मार्डी तालुका उत्तर सोलापूर २) प्राथमिक आश्रमशाळा, ७९९ गोविंदपूर, पंढरपूर येथे कार्यरत आहे. या आश्रमशाळेमध्ये एकूण प्रत्येकी १४० मान्यसंख्या आहे. प्रवेशीत विद्यार्थ्यांना निवास व भोजनाची सोय तसेच दोन ड्रेस, अंथरुण, पांघरुण शालेय साहित्य व शिक्षण मोफत पुरविल्या जातात. या साठी संस्थेस शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व प्रतिविद्यार्थी प्रतिमहा र. रु. १५००/- आकरा महिन्यासाठी परिपोषण अनुदान दिले जाते.</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td>मागासवर्गीय ग्रहनिर्माण संस्थाना जमिन अनुदान व बांधकाम अनुदान</td><td>मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था महाराष्ट्र सहकारी कायदया नुसार नोंदणीकृत आहेत. अशांना समाज कल्याण विभागाकडून बांधकाम अनुदान व मंजूर अनुदान मंजूर केली जाते. या मध्ये बांधकाम खर्चाच्या मर्यादीत ३०% अनुदान दिले जाते. यामध्ये एकूण खर्चापैकी ५०% बँक कर्ज २०% स्वीयसहाय्य व ३०% अनुदान या प्रमाणे बांधकाम खर्चाची मर्यादा आहे.<br>पात्रतासाठी उत्पन्न व बांधकाम खर्चाची मर्यादा
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>उत्तन्न गट</th><th>उत्पन्नाची मर्यादा</th><th>बांधकाम खर्चाची मर्यादा</th></tr>
<tr><td>१</td><td>आर्थिक दुर्बल घटक</td><td>र.रु.२५०००/- पर्यंत वार्षिक</td><td>र.रु.६००००/- (अब) वर्ग</td></tr>
<tr><td>२</td><td>अल्प उत्पन्न गट</td><td>र.रु.२५००१ ते ५००००/- वार्षिक</td><td>र.रु.१०००००/-(अ) वर्ग र.रु.८००००/-(ब)वर्ग</td></tr>
<tr><td>३</td><td>मध्यम उत्पन्न गट</td><td>र.रु.५०००१ ते ७५०००/-वार्षिक</td><td>र.रु.१५००००/-(अ) वर्ग र.रु.१०००००/-(ब) वर्ग</td></tr>
<tr><td>४</td><td>मध्यम उच्च उत्पन्न गट</td><td>र.रु.७५००१ ते ९५०००/-</td><td>र.रु.१५००००/- (अ) वर्ग र.रु.१०००००/- (ब) वर्ग</td></tr>
</table>
शासन निर्ण क्रमांक बीसीएच/२००६/प्र.क्र.१३८/मावक-२/मंत्रालय विधान भवन ४०००३२ दिनांक १ सप्टेंबर २००६ अन्वये या संस्थाची वित्तीय संस्थाकडून कर्ज घेतले आहे. किंवा कर्ज न घेता बांधकाम पुर्ण करण्यास स्वखर्चाने तयार असतील अनुदान मंजूर करण्यात येते. अनुदान वितरण चार हत्यात केले जाते. पहिला हप्ता प्रस्ताव मंजूर झाल्या नंतर १०% दुसरा हप्ता घराचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर ५% तीसरा हप्ता घराचे छतापर्यंत पुर्ण झाले नंतर १०% चौथा हप्ता घर पुर्ण झाल्यानंतर ५%</td><td></td></tr>
<tr><td>८</td><td>व्यसनमुक्ती सप्ता साजरा करणे ( २ ते ८ ऑक्टोंबर )</td><td>आंमली पदार्थ सेवन विरोधी जन जागृती होण्यासाठी राष्ट्रपीता महात्मा गांधी व कै. लालबहादूर शास्त्री यांच जयंती प्रत्यार्थ पंचायत समिती, ग्रामपंचायत झोपडपट्टी व आदीवासी विभाग, सेवाभावी संस्था, लोककलावंत, नेहरु युवा केंद्र, महिला मंडळे, राष्ट्रीय सेवा योजना केंद्र, सहकारी अनुदानीत व्यसनमुक्ती केंद्र यांच्या सहभागातून सांस्कृतीक कार्यक्रम, चित्र प्रदर्शन रॅली, सभा बैठका चर्चासत्रे तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन इत्यादी प्रभावी माध्यमाद्वारे जागृती मोहिम राबवून व्यसनमुक्ती सप्ताह साजरा केला जातो.</td><td></td></tr>
<tr><td>९</td><td>समाज कल्याण विभाग,जि.प. सोलापूर कडील राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती.</td><td>मागासवर्गीय मुलींचे प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण कमी करणे. यासाठी इयत्ता ५ वी ते ७ वी मधील मुलींना शिष्यवृत्ती देण्याची सन १९९५ – १९९६ पासून आहे. त्याच धर्तीवर ८ वी ते १० वी मधील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी होण्यासाठी सन २००३ – २००४ या शैक्षणिक वर्षापासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनांतर्गत इयत्ता ८ वी ते १० अनुजातीच्या मुलींसाठी दरमहा १००/- प्रमाणे जुन ते मार्च या दहा महिन्याला प्रत्येक १०००/- या प्रमाणे उपस्थित भत्ता म्हणून अदा करण्यात येतो. शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय मुलींना उत्पन्नाची अट राहणार नाही. गुणांचीही अट राहणार नाही. विद्यार्थीनीची उपस्थिती नियमित असावी. या योजनेचे प्रस्ताव गटशिक्षणाधिकारी, कॅम्पद्वारे या कार्यालयात सादर करण्यात येतात. या योजनेचे अनुदान एकाच हप्त्यात ऑनलाईन थेट मुलींच्या खात्यावर दिली जाते.</td><td></td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td>प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती देणे</td>
<td>एक इयत्तेमधील किमान ५०% गणासह वार्षिक परिक्षामध्ये मागासवर्गीयांमध्ये पहिला व दुसरा आलेल्या विद्यार्थ्यांस इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंत ५००/- प्रती विद्यार्थी तसेच इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत १०००/- प्रती विद्यार्थी प्रमाणे गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.<br>सदर योजनेसाठी विद्यार्थी मागासवर्गीय असावा व ५०% पेक्षा जास्त टक्केवारी असावी. असे विद्यार्थ्यांना या कार्यालयाकडून गुणवत्ता शिष्यवृत्ती अदा केली जाते. तालुकास्तरावर कॅम्प आयोजितकरुन प्रस्तावांना मंजूरी देण्यात येते. या योजनेचे अनुदान एकाच हप्त्यात सन २०१७ – २०१८ पासून आफलाईन थेट मुलीं / मुले यांच्या खात्यावर दिली जाते.</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>शिक्षण फी व परिक्षा फी प्रदान करणे. (मागासवर्गीय विद्यार्थीना)</td>
<td>अनु.जाती/जमाती/विजाभज/विमाप्र मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून त्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व मान्यताप्राप्त शिक्षण कामासाठी शालेय फी माफ वपरिक्षा फीसाठी फॉर्म फी अदा करण्यात येते.एक वेळ एका वर्गात नापास असलेल्या विद्यार्थ्यांना शालेय फी मंजूर केली जाते या योजनेसाठी शाळेने विद्यार्थ्यांची नांवे जात इत्यादी माहिती देवून सादर केली जाते. परिक्षा फी (एसएससी) र.रु.२००/-प्रमाणे व शैक्षणिक फी शिक्षण विभाग यांचेकडून मान्य केलेल्या दरा प्रमाणे अदा केली जाते.सन ०८ – ०९ पासून परिक्षा फी च्या दरात वाढ होऊन र.रु. ३००/- झालेली आहे.शिक्षण फी हि शाळेच्या बँक खात्यावर ऑनलाईन जमा केली जाते. परिक्षा फी ची रक्कम ऑनलाईन थेट मुलींच्या खात्यावर जमा केली जाते.</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>इयत्ता ५ वी ते ७ मध्ये शिकणाऱ्या अनु. जाती विमामुक्त भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील मुलींना शिष्यवृत्ती</td>
<td>इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थीनींना सदर योजनेमध्ये मुलींची उपस्थिती सुधारणा होणे कामी दरमहा ६०/- प्रमाणे शिष्यवृत्ती दहा महिन्याकरीता र.रु.६००/-प्रती विद्यार्थीनींना दिली जाते. परंतु शासन निर्णय क्र.डबीसी/२००३/प्र.क्र.४१७/मावक२/दिनांक ३१ मार्च २००५ अन्वये देण्यात येणाऱ्या दरमहा ६०/- योजना इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे असे या योजनेला नवीन नांव देण्यात आले. या कार्यालयामार्फत जिल्हयाच्या ठिकाणी कॅम्पचे आयोजन करुन प्रस्तावाची छाननी करुन मंजूरी देण्यात येते. या योजनेचे अनुदान एकाच हप्त्यात ऑनलाईने थेट मुलींच्या खात्यावर दिली जाते.</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>२०% सेस फंड मधीलमागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी शेळीगट ( ४ शेळया व १ बोकड ) मागासवर्गीय शेतकऱ्यांना विद्युत मोनोब्लॉक पंपसेट ( ५ एच.पी.) चे वाटप ग्रामीण भागातील मागासवर्गीय शेतकऱ्यांचे आर्थिक विकासासाठी शेतीची सिंचन क्षमता वाटप करणे.</td>
<td>१) ग्रामीण भागातील अनुजाती, अनुजमाती, विमुक्त भटक्या जमाती या प्रवर्गातील मागासवर्गातील शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देता येईल.<br>२) लाभार्थ्यांचे नांवे शेतजमीनीचा ७ / १२ उतारा, ८ अ, व ६ ड चा उतारा सादर करावा लागेल.<br>३) लाभार्थीचे नांवे किमान ६० आर व कमाल ३ हेक्टर एवढी शेत जमीन असावी.<br>४) लाभार्थीचे जमीन उताऱ्यावर पाण्याचा स्त्रोत असल्याचे नमुद करावे लागेल.<br>५) लाभार्थीने साहित्य विकल्याचे, गहाण ठेवल्याचे अथवा विल्हेवाट लावल्याचे निदर्शनास आल्यास संपूर्ण रक्कम एकरकमी वसुली केली जाईल.<br>६) लाभार्थीचे विद्युत मोटारीसाठी विद्युतमंडाळाची डिमांड नोट भरलेबाबत दाखला सादर करावा लागेल.<br>७) शेतकऱ्यास देण्यात आलेले साहित्य वापर करीत असल्याची स्थळ तपासणी गट विकास अधिकारी यांनी ६ महिन्याच्या आत करुन विनियोग दाखला सादर करावयाचा आहे.<br>८) लाभार्थ्यांस ज्या प्रयोजनासाठी साहित्य मंजूर केलेले असेल त्याच कारणासाठी साहित्य वापर होईल या आशयाचे रुत्र २० चे स्टॅप पेपरवर वाटपापूर्वी करारनामा करुन द्यावा लागेल.<br>९) साहित्याचे वाटप गट विकास अधिकारी यांचे मार्फत करण्यात येईल.<br>१०) लाभार्थ्यांने यापुर्वी या प्रकारच्या कुठल्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसल्याची गट विकास अधिकारी यांनी खात्री करावी. तसेच जमीन धारणा किमान व कमाल नियमानुसार असलेबाबत पाण्याच्या स्त्रोत या सर्व बाबींची खात्री करुनच लाभार्थ्यांची शिफारस करावी.<br>११) शासकीय अथवा निमशासकीय सेवेत असलेल्या कुटूंबातील व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.<br>१२) लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रक्कम रुपये १,००,०००/- पर्यंत असावे. दारिद्रय रेषेखालील कुटूंबास प्राधान्य राहील.<br>१३) सोबत अर्जाचा नमुना</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>अस्वच्छ व्यवसायात कामकरण्याऱ्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती देणे.</td>
<td>अस्वच्छ व्यवसायात असणाऱ्या पालकांच्या शिष्यवृत्ती देण्याची भारत सरकारची योजना या कार्यालयाकडून कार्यान्वीत केली जाते. यासाठी विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. या योजनेचे निकष पुढे दिले आहे.निकष / अटी<br>१) ही योजना इयत्ता १ ली ते १० वी साठी आहे. एका पालकाची जास्तीत जास्त दोन अपत्ये लाभ घेवू शकतात. उत्पन्नाची मर्यादा नाही. सर्व जाती / धर्माला लागू आहे.<br>२) विद्यार्थ्यांचे पालक पुढील पैकी व्यवसाय करीत असले तर शिष्यवृत्ती घेता येते. अ) कातडी सोलणे ब) कातडी कमावणे क) डोक्यावर मैला वाहून नेणे ड) कचरा गोळा करणे तसेच कचरा वेचणे इत्यादी अर्जातील प्रमाणपत्र पुर्णपणे भरुन त्यावर सही / शिक्का घेणे आवश्यक आहे.<br>३) शिष्यवृत्ती वार्षिक दर पुढील प्रमाणे आहे.
<table>
<tr><th rowspan="2">अ.क्र.</th><th colspan="2">अ-वसतीगृहात न राहणारे विद्यार्थी</th><th colspan="2">ब-वसतीगृहात राहणारे विद्यार्थी ( पुरावा आवश्यक )</th></tr>
<tr><th>इयत्ता</th><th>रक्कम रुपये</th><th>इयत्ता</th><th>रक्कम रुपये</th></tr>
<tr><td>१</td><td>इयत्ता १ ली ते ५ वी</td><td>र.रु. ३०००/-</td><td>इयत्ता ३ री ते ८ वी</td><td>८०००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>इयत्ता ६ व ते ८ वी</td><td>र.रु. ३०००/-</td><td>इयत्ता ९ वी ते १० वी</td><td>८०००/-</td></tr>
</table>
४) संबंधित यंत्रणेचे अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.<br>५) पात्र विद्यार्थीना मंजूर केलेली शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँकेतील खात्यावर जमा करण्यात येईल.<br>६) योजनेच्या निकषानुसार पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन योग्य त्या शिफारशीसह पाठविण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची आहे.<br>७) खोटी माहिती दिल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अपहार झाल्याचे सिध्द झाल्यास संबंधिता विरुध्द कारवाई केली जावू शकते.<br>८) अर्जाची विहित नमुना सर्व गटशिणाधिकारी यांचेकडे उपलब्ध करण्यात आला असून आवश्यकतेनुसार झेरॉक्स करुन वापरण्यात यावेत.</td>
<td></td>
</tr>
</table>

## कलम ४ (ब) (५) नमुना (ड)
## कामाशी संबंधित कार्यालयीन आदेश / धोरणात्मक परिपत्रके

| अ.क्र. | विषय | क्रमांक व तारीख | अभिप्राय (असल्यास) |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

## कलम ४ (१) (ब) (५) नमुना (इ)
## जिल्हा परिषद,सोलापूर येथील समाज कल्याण कार्यालया मध्ये उपलब्ध दस्ताऐवजी यादी दस्ताऐवजी विषय

| अ. क्र. | दस्तऐवजाचा प्रकार | विषय | संबंधित व्यक्ती/ पदनाम | व्यक्तीचे ठिकाण/उपरोक्त कार्यालयात उपलब्ध असल्यास |
|---|---|---|---|---|
| १ | वर्गीकरण वर्ग–अ | कायम स्वरुपी ठेवायाची नस्ती | संबंधित कर्मचारी वर्ग–३ | समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,सोलापूर |
| २ | वर्गीकरण वर्ग–ब | अभिलेख कक्षात ३० वर्षापर्यंत जन करुन ठेवावयाच्या नस्त्या | संबंधित कर्मचारी वर्ग–३ | समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,सोलापूर |
| ३ | वर्गीकरण वर्ग–क | अभिलेख कक्षात ५ वर्षापर्यंत जन करुन ठेवावयाच्या नस्त्या | संबंधित कर्मचारी वर्ग–३ | समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,सोलापूर |
| ४ | वर्गीकरण वर्ग–ड | लेखा परिक्षणा नंतर करावयाच्या नस्त्या / जतन करावयाच्या मुदत संपलेल्या नस्त्या | संबंधित कर्मचारी वर्ग–३ | समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,सोलापूर |

## कलम ४ (अ) (४)
## जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण विभाग कार्यालयामध्ये दस्तऐवजांची वर्गवारी

| अ.क्र. | विषय | दस्तऐवजांचा प्रकार/नस्ती/ मस्टर नोंदपुस्तक व्हौचर इ. | प्रमुख बाबींचा तपशिवार | सुरक्षित ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | विकास कामे व कर्मचाऱ्यांची आस्थापना | शासन निर्णय,शासन परिपत्रके, प्रशासकीय आदेश, अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता. | | कायम अभिलेख |
| २ | | नोंदवही स्थावर मालमत्ता नोंदवही, पूर्ण कामांची नोंदवही, जामीन नोंदवही, ऑडीट नस्ती वर्ग – ३ व ४ तांत्रिक कर्मचाऱ्यांचे गोपनीय अभिलेख, पा. त. हस्तांतरण इत्यादी | | कायम अभिलेख |
| ३ | | वेतन देयक व इतर देयक प्रमाणक कॅशबुक चेक रजिस्टर इत्यादी | | ३० वर्ष |
| ४ | | मागासवर्गीय लाभार्थ्यांचे लक्षांकानुसार निधी मागणी, झालेला खर्च, तत्संबंधी पत्रव्यवहार | | २० वर्ष |
| ५ | | प्रगती अहवाल पुस्तिका, बारनिशी नोंदवही अनामत रक्कम, अनामत अदा नस्ती देयकासह, | | ५ वर्ष |

## कलम ४ (१) (ब) (७)
## जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण विभागाच्या परिणामकारक कामकासाठी जनसमयाशी सल्लमसलात करण्याची व्यवस्था

| अ.क्र. | सल्लामसलतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | कोणत्या अधिनियम / नियम / परिपत्राद्वारे | पुनरावृत्ती काल |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय स्तरावरुन कार्यवाही करण्यात येते. | | | |

**कलम ४ (१) (ब) (८)**

**जिल्हा परिषद, सोलापूर समाज कल्याण कार्यालयाच्या समितीची यादी प्रकाशित करणे.**

| अ. क्र. | समितीचे नांव | समितीचे सदस्य | समितीचे उद्दिष्ठ | किती वेळा घेण्यात येते | सभा जन समायासाठी खुली आहे किंवा नाही. | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | समाज कल्याण विभाग | **निरंक** | | | | |

**कलम ४ (१) (ब) (८) नमुना (क)**

**जिल्हा परिषद, सोलापूर समाज कल्याण कार्यालयाच्या परिषदांची यादी प्रकाशित करणे.**

| अ. क्र. | संस्थेचे नांव | संस्थेचे सदस्य | संस्थेचे उद्दिष्ठ | किती वेळा घेण्यात येते | सभा जन समायासाठी खुली आहे किंवा नाही. | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **निरंक** | | | | | |

**कलम ४ (१) (ब) (९)**

जिल्हा परिषद येथील समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची नांवे व पत्ते मासिक वेतन

| अ. क्र. | पदनाम | अधिकारी / कर्मचारी यांचे नांव | वर्ग | या कार्यालयात रुजू दिनांक | सेवेमध्ये रुजू दिनांक | दुरध्वनी क्रमांक | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी अतिरिक्त पदभार | श्रीमती. सुलोचना सोनवणे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर | वर्ग – अ | ०७/०२/२०२५ | - | ९५९४९६१६१९ ९५४५५०५४७९ | - |
| २ | कार्यालयीन अधिक्षक | श्री. विलास कुंडलिक शिंगाडे | वर्ग – क | ०१/१२/२०२३ | ०३/०६/२००४ | ९६५७६३४३५६ | ७२३६६/- |
| ३ | वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता | रिक्त पद आहे. | | | | | |
| ४ | सहाय्यक सल्लागार | रिक्त पद आहे. | | | | | |
| ५ | सहाय्यक लेखाधिकारी | श्री. भूषण काळे | वर्ग – क | १६/१०/२०२४ | - | ९८५०९६७९१८ | ९८०७६/- |
| ६ | विस्तार अधिकारी | श्रीमती. स्वाती सुहास गायकवाड | वर्ग – क | १४/१०/२०२० | २६/०८/२००९ | ७९७२१५३९७२ | ९९५६१/- |
| ७ | समाज कल्याण निरीक्षक | एकूण ५ पदे रिक्त आहे. | वर्ग – क | | | | |
| ८ | वरिष्ठ सहाय्यक | श्री. बसवराज मल्लिकार्जून भंडारकवठे | वर्ग – क | ०८/१२/२०२३ | १२/०५/२००८ | ८८८८०७४०८२ | ८३६८५/- |
| ९ | कनिष्ठसहाय्यक (लेखा) | श्री. शशिकांत प्रकाश ढेकळे | वर्ग – क | ०८/०८/२०१२ | ०८/०८/२०१२ | ९५६१९९१९०५ | ४४४५४/- |
| १० | कनिष्ठ सहाय्यक | श्रीमती. निलिमा रविंद्र ढाळजी | वर्ग – क | २४/०५/२०२१ | २४/०५/२०२१ | ९१७५२६४४६१ | ४०६७४/- |
| ११ | वाहन चालक | पद रिक्त आहे. | वर्ग – क | | | | |
| १२ | परिचर | श्री. खलील लतीफ जमादार | वर्ग – ड | १२/०९/२०१२ | १२/०९/२०१२ | ९९२३७९२२२७ | ४२७४८/- |
| १३ | परिचर | श्री. सुनिल चव्हाण | वर्ग – ड | ०३/१०/२०२४ | - | | ६४६६१/- |

**कलम ४ (१) (ब) (१०)**
**जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची वेतनांची विस्तृत माहिती प्रकाशीत करणेबाबत.**

| अ.क्र. | वर्ग | वेतन रुपरेषा | इतर अनुज्ञेय भत्ते | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नियमित (महा.भत्ता, घरभाडे, शहरभत्ता | प्रसंगानुसार (जसे प्रवास भत्ता) | विशेष (प्रकल्प भत्ता,प्रशिक्षण |
| १ | १ | १५६०० – ३९१०० | नियमानुसार | - | - |
| २ | २ | ९३०० – ३४८०० | नियमानुसार | - | - |
| ३ | ३ | ९३०० – ३४८०० | नियमानुसार | - | - |
| ४ | ३ | ५२०० – २०२०० | नियमानुसार | - | - |
| ५ | ३ | ५२०० – २०२०० | नियमानुसार | - | - |
| ६ | ३ | ९३०० – ३४८०० | नियमानुसार | - | - |
| ७ | ४ | ४४४० – ७४४० | नियमानुसार | - | - |

**कलम ४ (१) (ब) (११)**
**जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण विभाग कार्यालयाचे मंजूर अंदाजपत्रक व खर्चाचा तपशिल यांची विस्तृत माहिती प्रकाशीत करणे.**

अंदाजपत्रकाचा प्रतीचे प्रकाशन
अनुदानाच्या वितरणाच्या प्रतीचे प्रकाशन

| अ. क्र. | अंदाजपत्रकीय शीर्षाचे वर्णन | अनुदान | नियोजित वापर (क्षेत्र व कामाचा तपशील) | अधिक अनुदान अपेक्षित रुपयात | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | नियमित आस्थापना राज्य शासकीय कर्मचारी (२२२५०१३६) | - | जिल्हा अनुदान वितरण | - | - |
| २ | कार्यव्यापी आस्थापना २०५३०५६५ | - | जिल्हा अनुदान वितरण | - | - |
| ३ | दिव्यांचे कल्याण (आस्थापना) २२३५२९५८ | - | जिल्हा अनुदान वितरण | - | - |

**कलम ४ (१) (ब) (१२) नमुना (अ)**
जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण कार्यालयातील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपध्दती सन ----------------- या वर्षासाठी प्रकाशीत करणे.

**कलम ४ (१) (ब) (१२) नमुना (ब)**
जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण कार्यालयातील अनुदान कार्यक्रमांतर्गत विस्तृत यादी प्रसिध्द करणे.

| अ.क्र. | लाभार्थींचे नांव व पत्ता | अनुदान/लाभ याची रक्कम (स्वरुप) | निवड पात्रतचे निकष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |
| - | - | - | - | - |

**कलम ४ (१) (ब) (१३) नमुना**

जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण कार्यालयातील मिळणाऱ्या सवलतीचा परवाना याची चालू वर्षाची तपशीलवार माहिती.

परवाना/परवानगी/सवलतीचे प्रकार

| अ.क्र. | परवाना | परवा | परवाना | दिनांक | दिनांक | साधारण | परवायाची |
|---|---|---|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - | - | - | - |

**कलम ४ (१) (ब) (१४) नमुना**

जिल्हा परिषद सोलापूर येथील समाज कल्याण कार्यालयातील माहितीचे इलेक्ट्रॉनिक्स स्वरुपात साठविलेली माहिती प्रकाशीत करणे. चालु वर्षा करीता.

| अ.क्र. | दस्तऐवजाचा प्रकार | विषय | कोणत्या इलेक्ट्रेनीक्स नमुन्यात | माहिती मिळविण्याची पध्दती | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|
| - | - | - | - | - | - |

- टेप
- फिल्म
- सीडी
- प्लॉपी
- इतर कोणत्याही स्वरुपात

**कलम ४ (१) (ब) (१५) नमुना**

जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण कार्यालयात उपलब्ध सुविधांचा तक्ता प्रकाशीत करणे.

- उपलब्ध सुविधा
- भेटण्याची वेळे संदर्भात माहिती – सकाळी ३.०० ते ५.००
- वेबसाईट विषयी माहिती – नाही
- कॉलसेंटर विषयी माहिती –
- अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहिती – अ,ब,क,ड,नुसार अभिलेख गृहात उपलब्ध
- कामाच्या तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहिती – अ, ब, क, नुसार
- नमुने मिळणे बाबत उपलब्ध माहिती – निरंक
- सुचना फलकाची माहिती – आहे
- ग्रंथालय विषयी माहिती – निरंक

| अ.क्र. | सुविधेचा प्रकार | वेळ | कार्यपध्दती | ठिकाण | जबाबदार व्यक्ती कर्मचारी | तक्रार निवारण |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | भेटण्याची वेळ दर सोमवार व मंगळवार व सुट्टीचा दिवस सोडून | दुपारी ३.०० वा. ते ५.०० वा. | | समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर | कार्यालयीन अधिक्षक | जिल्हा समाज कल्याण अधिकारी |

**कलम ४ (१) (ब) (१६)**

जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी/सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी/अपिलीय प्राधिकारी (तेथील लोक प्राधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील) यांची विस्तृत माहिती प्रकाशित करणे.

अ. शासकीय माहिती अधिकारी

| अ. क्र. | शासकीय माहिती अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता/फोन | ई – मेल | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. एस. टी. सोनकांबळे | कार्यालयीन अधिक्षक | सोलापूर | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, २ री इमारत तळमजला | zpsolapurswo@gmail.com | जिल्हा समाज कल्याण अधिकारी |

ब. सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी

| अ.क्र. | सहा.शासकीय माहिती | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता/फोन | ई – मेल |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

क. अपिलीय अधिकारी

| अ. क्र. | अपिलीय अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता/फोन | ई – मेल | यांच्या अधिस्तशासकीय माहिती अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती. सुलोचना सोनवणे | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सोलापूर जिल्हा | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, २ री इमारत तळमजला | zpsolapurswo@gmail.com | श्री. एस. टी. सोनकांबळे, कार्यालयीन अधिक्षक |

**कलम ४ (ब) (१७)**

जिल्हा परिषद, सोलापूर येथील समाज कल्याण कार्यालयातील प्रकाशित माहिती.

**कलम ४ (१) (क)**

सर्वसामान्य लोकांची संबंधित महत्वाची निर्णय व धोरणे यांची यादी प्रकाशीत करिता तयार करणे व वितरीत करणे.

(सुलोचना सोनवणे)
जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद, सोलापूर